Listening Passages

## मुंगी आणि साखर

एक मुंगी चालत होती. तिला वाटेत साखरेचे कण दिसले. तिने एक कण तोंडात घेतला. ती पुढे गेली. कण खाली पडला. तिने परत उचलला. असे करत करत तिने खूप साखर जमा केली. मुंगीला साखर आवडते. साखर सांडली की मुंगी येतेच!

प्रश्न

१. ही कोणाची गोष्ट आहे?

२. मुंगीला वाटेत काय दिसले?

३. तिने कण कसा उचलला?

४. मुंगी कधी येते?

५. मुंगीला साखर का आवडत असेल?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Passages

## ढगांची मजा

आकाशात ढग जमले होते. ढगांचे आकार वेगवेगळे होते. मला एक ढग हत्तीसारखा दिसत होता. दुसरा ढग कापसाच्या ढिगासारखा दिसत होता. ताईला एक ढग राक्षसासारखा दिसत होता. दादाला एक ढग डोंगरासारखा दिसत होता. एक ढग खूप काळा होता. वारा आला की ढगांचे आकार बदलत होते. ते पाहून मला खूप मजा वाटली. मी ढगांची चित्रे काढली.

प्रश्न

१. मला ढग कसे दिसले ?

२. ताईला आणि दादाला ढग कसे दिसले?

३. एका ढगाचा रंग कसा  होता?

४. ढगांचे आकार का बदलत होते?

५. तुम्हाला ढगात काय आकार दिसतात?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Reading Passages

# माझे जेवण

आई रोज भात करते. भात पांढरा असतो.कधी कधी आई भेंडीची भाजी करते. मला ताटात गरम भात वाढते. भेंडीची हिरवी भाजी वाढते. बाजूला दही पण वाढते. पांढरा भात, हिरवी भाजी आणि पांढरे दही मला खूप आवडते. असे जेवण मी पोटभर जेवतो.

प्रश्न

१. भाताचा रंग कसा असतो?

२. आई भात कुठे वाढते?

३. जेवणाच्या ताटात कोणत्या गोष्टी आहेत?

४. पांढऱ्या रंगाचे काय काय आहे?

५. तुमच्या जेवणात काय काय पदार्थ असतात?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Passages

## बिचारी आई

काल आईला ताप आला. आईला कधीच ताप येत नाही. पण काल आला. बिचारी आई! मग ती झोपली. बाबांनी खिचडी केली. मी बाबांना मदत केली. आईला औषध नेऊन दिले. मग आईला बरे वाटले. आई बरी झाली आणि मला खूप आनंद झाला.

प्रश्न

१. आईला काय झाले?

२. बाबांनी काय केले?

३. आईला कसे बरे वाटले?

४. आईला ताप का आला असेल?

५. तुम्हाला बरे नसते तेव्हा आई काय करते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.